# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## प्रेसनोट

## पीएमपीएमएलच्या खासगी बस ठेकेदारांकडील चालकांचा संप

आज दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी पीएमपीएमएलच्या काही खासगी बस ठेकेदारांकडील चालकांनी विशेषतः इलेक्ट्रिक बसेस ठेकेदारांकडील चालकांनी सकाळच्या सत्रात प्रशासनाला कोणतीही पूर्वकल्पना न देता आडमुठे धोरण स्वीकारून संप पुकारला आहे.

खासगी बस ठेकेदारांकडील चालकांनी अचानक पुकारलेल्या संपामुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील सर्व अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, वाहक व चालक यांच्या असलेल्या साप्ताहिक सुट्ट्या रद्द करून पुणेकरांची गैरसोय होऊ नये म्हणून महामंडळाकडून नियमित मार्गस्थ होणारे जवळपास सर्व शेड्युल मार्गस्थ करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करण्यात आले.

परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह व सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर यांनी विशेष करून साप्ताहिक सुट्टी असताना देखील जे चालक व वाहक कामावर रुजू झाले त्यांचे व इतर सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. पीएमपीएमएल ची बससेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने व या बससेवेवर सर्व सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे महामंडळाकडील काही खासगी बस ठेकेदारांकडील चालकांनी पुकारलेला संप व इतर कोणत्याही कारणामुळे निर्माण झालेली कोणतीही परिस्थिती हाताळून प्रवाशी सेवा सुरळीतपणे सुरु ठेवण्यासाठी पीएमपीएमएल कटिबद्ध आहे हे आजच्या सार्वत्रिक प्रयत्नातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

दरम्यान खासगी ठेकेदारांकडील चालकांनी पुकारलेला संप मागे घ्यावा यासाठी पीएमपीएमएल प्रशासन व संबंधित ठेकेदार यांच्यामध्ये चर्चा सुरु आहे.

---

दि. २५/०८/२०२३.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.